# हिंगोली जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय,हिंगोली.

## दिनांक १८.०५.२०२४

**जुगार सदराखाली विशेष मोहिम अंतर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये जुगार खेळणारे अंतर्गत दि. १७/०५/२०२४ रोजी जुगार कायदया अंतर्गत हिंगोली जिल्हयामध्ये एकुण ०१ ठिकाणी छापा मारूण कार्यवाही करून आरोपीतांनकडुन एकुण ८१०/—रू. किमतीचा मुददेमाल जप्त करण्यात आला असुन आरोपीता विरूध्द जुगार कायदयाअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**दारूबंदी सदराखाली विशेष मोहिम अंतर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैध दारू विक्री अंतर्गत दि. १७/०५/२०२४ रोजी दारूबंदी कायदया अंतर्गत हिंगोली जिल्हयामध्ये एकुण ०३ ठिकाणी छापा मारूण कार्यवाही करून आरोपीतांनकडुन एकुण ५,३४०/—रू. किमतीचा मुददेमाल जप्त करण्यात आला असुन आरोपीता विरूध्द दारूबंदी कायदयाअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि. १७/०५/२०२४ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहन चालकाविरूध्द कलम २८३ भादंवि अन्वये एकुण १४ ठिकाणी कार्यवाही करण्यात आली.

**अवैधरित्या शस्त्र बाळगणाऱ्या विरुद्ध विशेष मोहिम अंतर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैधरित्या शस्त्र बाळगणा—या विरुध्द दि. १७/०५/२०२४ रोजी पोस्टे वसमत ग्रामीण येथे ०१ ठिकाणी कलम ३/२५ भारतीय हत्यार कायदा अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असुन पुढील तपास पोलीस करत आहेत.

**अन्न सुरक्षा अधिनीयम अंतर्गत गुटखा विक्रत्यावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अन्न सुरक्षा अधिनीयम अंतर्गत दि. १७/०५/२०२४ रोजी पोस्टे कुरूंदा येथे मौजे कुरूंदा येथील जुण्या बस स्थानकाच्या जवळ माउली बेकरीमध्ये बिट नं १ येथे यातील आरोपीने महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधीत घातलेल्या गुटखा जे खाल्याने मानवी जिवीतास धोका निर्माण होईल असा गुटखा ताब्यात बाळगुन विक्री करीत असतांना गुटखा ,जर्दा व पानमसाला असा एकुण ६६,५५८ रू मुद्देमाल मिळुन आला म्हणुन गुन्हा.